(75)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# जिल्हा नियोजन समिती,
# जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

ई-मेल : dpo.jalna@gmail.com

दूरध्वनी क्रमांक : 02482 225606

जावक क्र. जिनिस/ O/2022/Jan/AAO/00906

दिनांक - 08/01/2022

**प्रशासकीय मान्यता आदेश**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम -धनसावंगी**

**विषय : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम-सन 2021-2022 या योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.**

**संदर्भः- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.स्थाविका-616/प्र.क्र.96/का.1482, दि.12/07/2016 व दि.31/08/2017.**

**2. मा.ना.श्री.राजेश टोपे, मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण तथा वि.स.स.धनसावंगी यांचे दि.10/07/2021 रोजीचे पत्र.**

**3. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांचे पत्र क्र.263, दि.23/09/2021.**

**4. प्रस्तावीत कामासाठी संबंधीत ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक यांचे नाहरकत व देखभाल-दुरुस्ती प्रमाणपत्र तसेच जागा मालकीचे प्रमाणपत्र व वीज देयक अदा करण्याबाबतचे प्रमाणपत्र.**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक कार्यप्रणालीनुसार जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार दिले आहेत. **श्री. राजेशभैय्या टोपे ,विधानसभा मतदार संघ यांचे धनसावंगी** या मतदार संघाकरीता उपलब्ध होणा-या निधीतून मा.आमदार महोदयांनी प्रस्तावित केल्यानुसार व संबंधित कार्यान्वियीन यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकानुसार खालील तक्त्यातील कामांना मार्गदर्शक सुचनानुसार पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदरची प्रशासकीय मान्यता नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. यंत्रणेने सदर कामांचे कार्यारंभ आदेश काढण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याकडून जागेच्या मालकीचे तसेच कामाचे नाहरकत व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे. कामे नवीनच असल्याची तसेच कोणत्याही मोठ्या कामाचा भाग करुन लहान कामे म्हणून हाती घेण्यात येत नसल्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील. सदरची कामे कोणत्याही खाजगी अथवा वैयक्तिक मालकीच्या जागेवर अनुज्ञेय नाहीत. काम सुरु करण्यापूर्वी जागा निर्विवाद असल्याची खात्री यंत्रणेने करणे आवश्यक राहील. जागेच्या मालकीबाबत काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील.

**कार्यान्वियीन यंत्रणा -कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना** **(रक्कम हजारात)**

| अ. क्र. | कामाचा संकेतांक | तालुका | गाव/ शहर | कामाचे नाव | मा.आ.महोदय यांचे शिफारस पत्र क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ML /2122 /0511 | जालना | भाटेपूरी | मौजे भाटेपुरी येथे ग्रामपंचायत मालकीच्या जागेवर विंधनविहीर घेणे, ता.जालना. | I/DPC/JLN// PROP/ 7202100606 10/07/2021 | 17 23/09/2021 | 56.273 | 56.000 |
| | | | | | | एकूण (रु. हजारात) | 56.273 | 56.000 |
| | | | | | | **या आदेशान्वये एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम -अक्षरी रुपये छप्पन्न हजार फक्त** | | |

वरील कामांना प्रशासकीय मान्यता ही नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींचे पालन करणे कार्यान्वियीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

**अटी व शर्ती**

1 .अंदाजपत्रकानुसार कामाची जागा जी निश्चित असेल, त्याच जागेवर काम घेण्यात यावे त्यात कुठलाही बदल करू नये. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सदर कामांबाबत देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र आणि बांधकामास ना-हरकत दाखला प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही कामास सुरवात करण्यात येऊ नये.



Scanned with CamScanner

2 .आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दुरुस्ती/ सुधारणा स्वरुपाची कामे, पुतळा सुशोभिकरण, स्वागत कमान/ प्रवेशद्वार अशा प्रकारची कामे अनुज्ञेय नसल्याने वरील कामांमध्ये अशा प्रकारच्या उपकामांचा समावेश असल्यास अशी उपकामे करु नये.

3 .आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत काम मंजुर झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाची आहे. कार्यान्वियीन यंत्रणेस कोणत्याही परिस्थितीत कामास मुदतवाढ देता येणार नाही. कामे विहीत वेळेत पुर्ण न झाल्यास संबंधीत अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

4 .काम चालू असताना अंमलबजावणी अधिकारी यांनी स्वतः कामावर भेटी देऊन काम अंदाजपत्रकानुसार आणि ठरलेल्या कालावधीत चालू आहे याची वेळोवेळी खात्री करावी.

5 .काम पुर्ण झाल्यानंतर कामांची नोंद संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात मालमत्ता नोंदवहीत स्वंतत्र घेण्यात यावी.

6 .काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा पुर्णत्वाचा दाखला व कामावर केलेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र या कार्यालयास आठ दिवसाच्या आत सादर करावेत.

7 .कामनिहाय खर्चाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत या कार्यालयास सादर करावा.

8 .कामांची निविदा निश्चित करण्यापुर्वी कामाची जागा ही शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीची असल्याची खात्री करुनच कामास सुरवात करावी.

9 .कामे सुरू होण्या पुर्वीचे, काम प्रगतीत असतांना आणि काम पुर्ण झाल्यानंतरचे कामांचे छायाचित्र अंतिम देयकाची मागणी करतांना या कार्यालयास सादर करावे.

10 .क्षेत्रीय अधिका-यांनी या कामाच्या प्रत्येक बांधकामास सुरूवात करण्यापुर्वी काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्युत/ पाणीपुरवठा प्रकल्पांच्या जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या वरील कामावर कोणताही परीणाम होणार नाही याची खात्री करून घेतली पाहीजे.

11 .प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा कामावर झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक/बचत रक्कम काम पुर्ण झाल्यावर 30 दिवसाच्या आत या कार्यालयास परत करावी.

12 .मंजूर कामांची माहिती दर्शविणारा फलक कामाच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य आहे.

13 .या कामाचे निरीक्षण व तपासणीचे काम संबधीत कार्यकारी अभियंत्याकडुन आणि जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडुन अथवा महाराष्ट्र शासन यांनी नेमून दिलेल्या अधिकारी यांच्याकडुन केली जाऊ शकेल.

14 .वरील कामांना सुरवात करण्यापुर्वी वन विभाग, पर्यावरण विभाग व शासनाचे इतर विविध विभाग यांच्या कोणत्याही अटी/नियम/कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याबाबत कार्यन्वयीन यंत्रणेने खात्री करुन घेतली पाहिजे.

15 .वरील कामे पुर्ण झाल्यानंतर परीरक्षणासाठी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ताब्यात देऊन ताबा पावती या कार्यालयास सादर करावी.

16 .सदर काम हे कोणत्याही मोठ्या कामाचा भाग नसल्याची खात्री करण्यात यावी. तसेच कोणत्याही मोठ्या कामाचे लहान भाग म्हणून कामे प्रस्तावित केलेले नाही याची कार्यान्वियीन यंत्रणांनी खात्री करुनच कामास सुरवात करावी.

17 .सदर कामांचा या खासदार स्थानिक विकास कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही कार्यक्रमात अथवा योजनेत कामात समावेश झालेला नाही याची खात्री करूनच काम शुरू करावे.

18 .सदर कामांची उपयुक्तता ही सार्वजनिक स्वरुपाची असावी. कामांचा वापर/ उपयोग हा खाजगी/ वैयक्तिक/ खाजगी कार्यालयीन स्वरुपाचे वापरासाठी नसावा. वरील प्रस्तावित कामामुळे सार्वजनिक लोकोपयोगी कायमस्वरुपी मालमत्ता निर्माण झाली पाहिजे.

19 .सदर कामात खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसारच खरेदीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

20 .सदर कामे ही वर नमूद केलेल्या विधानसभा/विधानपरिषद मतदारसंघाच्या विहित कार्यक्षेत्रात असल्याची खात्री करुन या कामांना सुरवात करण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत मार्गदर्शक सुचनेनुसार काही कामे मतदार संघाच्या बाहेरील असू शकतील मात्र त्यासाठी कामाच्या नावात तसे नमुद केलेले असेल.

21 .सदर कार्यक्रमांतर्गत केवळ कामावरील खर्च अनुज्ञेय आहे. कोणताही प्रकारचा प्रशासकीय खर्च अथवा इतर खर्च उदा. सेंटेज चार्जेस,आकस्मिक खर्च अनुज्ञेय नसल्याने तसा खर्च या योजनेतून करण्यात येवू नये.

22 .सदर कार्यक्रमांतर्गत खाजगी/ धार्मिक स्थळे यांचे जागेवरील कामे, कार्यालयीन वा वैयक्तिक निवासी इमारती, खाजगी/ व्यापारी संस्थांची कामे अथवा मंदीराची/ धार्मिक स्थळाची कामे अनुज्ञेय नाहीत. सदर प्रकारची कामे करण्यात येऊ नये.

23 .सदर कार्यक्रमांतर्गत दिलेली रक्कम ही प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील बाबींवरच खर्च करण्यात यावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त रकमेशिवाय वाढीव निधी अनुज्ञेय नाही.

24 .1. संदर्भ क्र.1 मध्ये शासनाने नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. यंत्रणेने सदर कामांचे कार्यारंभ आदेश काढण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याकडून जागेच्या मालकीचे तसेच कामाचे नाहरकत व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे. सदरची कामे कोणत्याही खाजगी अथवा वैयक्तिक मालकीच्या जागेवर अनुज्ञेय नाहीत. 2. काम सुरु करण्यापूर्वी सदर काम दुरुस्ती सदराखालील नसल्याचे व नवीनच असल्याबाबत कार्यान्वियीन यंत्रणेने खात्री करावी. सदर कामे एखाद्या मोठ्या कामाचा लहान भाग करुन घेणे अनुज्ञेय नाही. 3. या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाची कामे शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवरच घेण्यात यावीत. कोणत्याही वैयक्तीक, राखीव किंवा खाजगी जागेवर घेण्यात येवू नयेत. जागेच्या मालकीबाबत कोणताही वाद उदभवल्यास त्यास कार्यान्वियीन यंत्रणेस सर्वस्वी जवाबदार धरण्यात येईल. या कार्यक्रमातून जमिनीचा मावेजा / नुकसानभरपाई, भूसंपादन अशा बाबी अनुज्ञेय नाहीत. 4. या कार्यक्रमांतर्गत मंजुर झालेली कामे चालु आर्थिक वर्षात किंवा जास्तीत जास्त पुढच्या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. प्रकल्प सुसाध्यतेस कार्यान्वियीन यंत्रणा जबाबदार असेल. 5. सदरील कामाचे कार्यक्षेत्र हे ग्रामपंचायत/स्थानिक स्वराज्य संस्था/शासन याव्यतिरिक्त इतर खाजगी व्यक्ती/शेतकरी/संस्था यांचे खाजगी मालकीच्या कार्यक्षेत्रात/ताब्यात/ मालकी हक्कात येत असल्यास सदर कामाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/शाखा अभियंता/उपअभियंता/कार्यकारी अभियंता यांनी सदर जागा ही शासनाकडे नियमानुसार हस्तांतरीत/दानपत्र/संमतीपत्र जे की योग्य त्या प्राधिका-याकडे नोंदणीकृत दस्तऐवज म्हणून नोंदणी झाल्याची व मालकी स्थापित झाल्याची खात्री करुनच कार्यारंभ आदेश द्यावेत व तद्नंतरच काम सुरु करावे. यासंदर्भात कोणतेही प्रशासकीय अथवा न्यायालयीन



Scanned with CamScanner

प्रकरण उद्भवल्यास त्याबाबत प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेस कार्यान्वियीन यंत्रणा सर्वस्वी जबाबदार राहील. 6. काम प्रत्यक्ष सुरु करण्यापूर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्युत/पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही किंवा अशाप्रकारच्या कोणत्याही प्रकल्पामुळे या कामावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री करावी. 7. सदर कार्यक्रमांतर्गत स्वागत कमानी, पुतळे, स्मारके अशाप्रकारची सुशोभिकरणाची तसेच दुरुस्तीची, देखभाल-दुरुस्तीची अथवा नुतनीकरणाची कामे अनुज्ञेय नाहीत. 8. सदर कार्यक्रमांतर्गत राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग तथा प्रमुख जिल्हा मार्गांची कामे अनुज्ञेय नसल्यामुळे अशा कामांना नजरचुकीने प्रशासकीय मान्यता दिली गेली असेल तरीही अशा कोणत्याही कामाची निविदा प्रसिध्दीस देवू नये. याबाबत काही वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील. 9. कामांची निरिक्षणे व तपासणी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मा.विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे मार्फत अथवा नियुक्त अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी करण्यात येईल. 10. बांधकाम विषयक कामांसंदर्भात कार्यान्वियीन यंत्रणेने कंत्राटदारासोबतच्या करारामध्ये अनुज्ञेय बांधकामाचा प्रकार (Type of Construction) व जमीन क्षेत्र (Area of Land), बांधकामाचे क्षेत्र (Built-up Area) आणि चटई क्षेत्र (Carpet Area) किती राहील याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच अशा करारामध्ये इमारत बांधकाम रेखाचित्र (Building Plans & Drawings) यांचा समावेश करणे यंत्रणेवर शासन निर्णयान्वये बंधनकारक व अनिवार्य आहे. प्रशासकीय मान्यतेव्यतिरिक्त बांधकामाध्ये भर घालणे/सुधारणा करणे/बांधकामाचे क्षेत्रामध्ये बदल करणे किंवा जमीन वापराच्या प्रयोजनामध्ये बदल करणे इत्यादी बाबी जिल्हाधिकारी व सक्षम नियोजन प्राधिकरण (म्हणजेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका, इत्यादी) यांच्या पूर्वमान्यतेशिवाय करता येणार नाहीत. 11. सदर कार्यक्रमांतर्गत कामावर होणारा खर्च हा अंदाजपत्रकाप्रमाणे प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या मर्यादेत करावा. अंदाजपत्रकाच्या तसेच कामाच्या तांत्रिक बाबी व गुणवत्तेबाबत कार्यान्वयीन यंत्रणा जबाबदार असेल. 12. अन्य नियमीत योजनेसाठी जे निकष, नियम, मर्यादा, कार्यपध्दती लागू असतील ते सर्व या कार्यक्रमांतर्गत कामांसाठी लागू राहतील. 13. काम पूर्ण झाल्यानंतर त्या कामाचे परिरक्षणासाठी होणारा खर्च या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय नाही. 14. यंत्रणेने सदरील काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे हस्तांतरण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे करावे व काम अर्धवट राहणार नाही याबाबत पूर्ण दक्षता घेण्यात यावी. 15. जिल्हा परिषद मालकीच्या जागेवरील कामे असल्यास यंत्रणेने कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी जिल्हा परिषदेची नाहरकत घेऊन त्यानंतरच कामांना सुरुवात करावी. कामांची अथवा निधीची द्विरुक्ती होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. याबाबत काही वाद उद्भवल्यास त्यासाठी कार्यान्वियीन यंत्रणेला सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल. 16. निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता कामाचे कार्यक्षेत्रात लागू असल्यास, आचारसंहितेच्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील. काम सुरु करण्यापूर्वी याबाबत योग्य दक्षता घ्यावी. 17. या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणारी मालमत्ता ही शासनाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची राहील. सदर मालमत्ता कोणत्याही व्यक्तीच्या / खाजगी संस्थेच्या / विश्वस्तांच्या नावे करणे अनुज्ञेय नाही. 18. स्मशानभूमी/कब्रस्थानची कामे करताना लोकांना बसण्यासाठी व थांबण्यासाठी बाकडी टाकणे / शेडस बांधणे, हातपाय धुण्यासाठी पाणी पुरवठ्याची सोय करणे, आवश्यकतेनूसार दहनासाठी स्टॅन्ड बांधणे, संरक्षणभिंत बांधणे, अंतर्गत पेव्हर ब्लॉक्स बसविणे/फरशी बसविणे/कॉंक्रीटीकरण करणे तसेच घाट बांधणे केवळ एवढीच कामे अनुज्ञेय आहेत. याव्यतिरिक्त कामांचा सदर कार्यक्रमांतर्गत समावेश अनुज्ञेय राहणार नाही. याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. 19. कामे पूर्ण झाल्यावर कामांच्या दर्शनी भागावर शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे फलक लावणे बंधनकारक आहे. 20. लहान रस्ते, पूल व साकव बांधणे ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानूसार हाती घ्यावीत. 21. प्रशासकीय मान्यता ज्या कामासाठी दिली आहे त्याच स्वरुपाचे बांधकाम होणे आवश्यक आहे. कामाच्या प्रकारात बदल केल्यास सदरची बाब आदेशाचे गंभीर उल्लंघन गृहीत धरुन, संबंधीत अभियंता/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली जाईल. 22. वीज देयके अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अभिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील. याबाबतचे हमीपत्र कार्यान्वयीन यंत्रणेने कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यापूर्वी मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे.

(श्री. विजय राठोड)
जिल्हाधिकारी जालना

**प्रति -**

कार्यान्वयीन यंत्रणा - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

प्रत- श्री. राजेशभैय्या टोपे ,विधानसभा मतदार संघ, घनसावंगी यांना माहितीस्तव सविनय सादर.

निधी वितरण / निवड नस्ती



Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

# जिल्हा नियोजन समिती,
# जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

ई-मेल : dpo.jalna@gmail.com

दूरध्वनी क्रमांक : 02482 225606

जावक क्र. जिनिस/ O/2022/Feb/CombineAA/01473

दिनांक - 16/02/2022

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम - घनसावंगी**

विषय : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम-सन 2021-2022 या योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यतेसह निधी वितरित करणे.

संदर्भ:- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.स्थाविका-616/प्र.क्र.96/का.1482, दि.12/07/2016 व दि.31/08/2017.

2. मा.ना.श्री.राजेश टोपे, मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण तथा वि.स.स.घनसावंगी यांचे दि.30/05/2021.

3. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांचे पत्र क्र.264, दि.23/09/2021.

4. प्रस्तावीत कामासाठी संबंधीत ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक यांचे नाहरकत व देखभाल-दुरुस्ती प्रमाणपत्र तसेच जागा मालकीचे प्रमाणपत्र,सदरील काम अन्य योजनेतुन विचाराधीन नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच वीजदेयके अदा करण्याबाबतचे हमीपत्र इत्यादी आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक कार्यप्रणालीनुसार जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाचे अधिकार दिले आहेत. मा. आ. श्री. राजेशभैय्या टोपे यांचे घनसावंगी या मतदार संघाकरीता उपलब्ध होणा-या निधीतून मा.आमदार महोदयांनी प्रस्तावित केल्यानुसार व संबंधित कार्यान्वियीन यंत्रणेकडुन तांत्रिक दृष्टया मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकानुसार खालील तक्त्यातील कामांना शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सुचनांनुसार पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत असून तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निधी वितरण करण्यात येत आहे..

**मागणी क्रमांक-४५१५००१२,**

**४५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,**

**१०२-सामूहिक विकास**

**पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना**

**(१) बहुउद्देशीय कार्यक्रम**

**(००)(०१)आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम**

**(४५१५००१२)(योजनांतर्गत)(दत्तमत) ५३ मोठी बांधकामे**

सदरची प्रशासकीय मान्यता नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. यंत्रणेने सदर कामांचे कार्यारंभ आदेश काढण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याकडून जागेच्या मालकीचे तसेच कामाचे नाहरकत व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे. कामे नवीनच असल्याची तसेच कोणत्याही मोठ्या कामाचा भाग करुन लहान कामे म्हणून हाती घेण्यात येत नसल्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील. सदरची कामे कोणत्याही खाजगी अथवा वैयक्तिक मालकीच्या जागेवर अनुज्ञेय नाहीत. काम सुरु करण्यापूर्वी जागा निर्विवाद असल्याची खात्री यंत्रणेने करणे आवश्यक राहील. जागेच्या मालकीबाबत काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील. वीजदेयके अदा करण्याबाबतच हमीपत्र प्राप्त करुन घ्यावे.

कार्यान्वियीन यंत्रणा - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

(रक्कम हजारात)

| अ. क्र. | कामाचा संकेतांक | तालुका | गाव/शहर | कामाचे नाव | मा.आ.महोदय यांचे शिफारस पत्र क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम | वितरित निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ML/2122/0665 | जालना | पाचनवडगांव | मौजे पाचनवडगाव येथे ग्रामपंचायत मालकीच्या जागेवर सार्वजनिक वापरासाठी विंधनविहीर घेणे, ता.जालना. | I/DPC/JLN//PROP/6202100465, 31/05/2021 | 16 23/09/2021 | 56.951 | 56.000 | 30.000 |

21 FEB 2022

108



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण (रु. हजारात) | 56.951 | 56.000 | 30.000 |
| या आदेशान्वये एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम - अक्षरी रुपये छप्पन्न हजार फक्त | | | |
| या आदेशान्वये एकूण वितरित निधी रक्कम - अक्षरी रुपये तीस हजार फक्त | | | |

वरील कामांना प्रशासकीय मान्यता ही नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींचे पालन करणे कार्यान्वियीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

अटी व शर्ती

1 .संदर्भ क्र.1 मध्ये शासनाने नमूद केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. यंत्रणेने सदर कामाचे कार्यारंभ आदेश काढण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याकडून जागेच्या मालकीचे तसेच कामाचे नाहरकत व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे. सदरची कामे कोणत्याही खाजगी अथवा वैयक्तिक मालकीच्या जागेवर अनुज्ञेय नाहीत.

2 .काम सुरु करण्यापूर्वी सदर काम दुरुस्ती सदराखालील नसल्याचे व नवीनच असल्याबाबत कार्यान्वियीन यंत्रणेने खात्री करावी. सदर काम एखाद्या मोठ्या कामाचा लहान भाग करुन घेणे अनुज्ञेय नाही. 3. या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाची कामे शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागेवरच घेण्यात यावीत. कोणत्याही वैयत्तीक, राखीव किंवा खाजगी जागेवर घेण्यात येवू नयेत. जागेच्या मालकीबाबत कोणताही वाद उदभवल्यास त्यास कार्यान्वियीन यंत्रणेस सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल. या कार्यक्रमातून जमिनीचा मावेजा / नुकसानभरपाई, भूसंपादन अशा बाबी अनुज्ञेय नाहीत. 4. या कार्यक्रमांतर्गत मंजुर झालेली कामे चालु आर्थिक वर्षात किंवा जास्तीत जास्त पुढच्या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. प्रकल्प सुसाध्यतेस कार्यान्वियीन यंत्रणा जबाबदार असेल. 5. सदरील कामाचे कार्यक्षेत्र हे ग्रामपंचायत/स्थानिक स्वराज्य संस्था/शासन याव्यतिरिक्त इतर खाजगी व्यक्ती/शेतकरी/संस्था यांचे खाजगी मालकीच्या कार्यक्षेत्रात/ताब्यात/ मालकी हक्कात येत असल्यास सदर कामाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/शाखा अभियंता/उपअभियंता/कार्यकारी अभियंता यांनी सदर जागा ही शासनाकडे नियमानुसार हस्तांतरीत/दानपत्र/संमतीपत्र जे की योग्य त्या प्राधिका-याकडे नोंदणीकृत दस्तऐवज म्हणून नोंदणी असल्याची व मालकी स्थापित झाल्याची खात्री करुनच कार्यारंभ आदेश द्यावेत व तद्नंतरच काम सुरु करावे. यासंदर्भात कोणतेही प्रशासकीय अथवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याबाबत प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेस कार्यान्वियीन यंत्रणा सर्वस्वी जबाबदार राहील. 6. काम प्रत्यक्ष सुरु करण्यापूर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्यूत/पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही किंवा अशाप्रकारच्या कोणत्याही प्रकल्पामुळे या कामावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री करावी. 7. सदर कार्यक्रमांतर्गत स्वागत कमानी, पुतळे, स्मारके अशाप्रकारची सुशोभिकरणाची तसेच दुरुस्तीची, देखभाल-दुरुस्तीची अथवा नुतनीकरणाची कामे अनुज्ञेय नाहीत. 8. सदर कार्यक्रमांतर्गत राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग तथा प्रमुख जिल्हा मार्गांची कामे अनुज्ञेय नसल्यामुळे अशा कामांना नजरचुकीने प्रशासकीय मान्यता दिली गेली असेल तरीही अशा कोणत्याही कामाची निविदा प्रसिध्दीस देवू नये. याबाबत काही वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील. 9. कामांची निरिक्षणे व तपासणी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मा.विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे मार्फत अथवा नियुक्त अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी करण्यात येईल. 10. बांधकाम विषयक कामांसंदर्भात कार्यान्वियीन यंत्रणेने कंत्राटदारासोबतच्या करारामध्ये अनुज्ञेय बांधकामाचा प्रकार (Type of Construction) व जमीन क्षेत्र (Area of Land), बांधकामाचे क्षेत्र (Built-up Area) आणि चटई क्षेत्र (Carpet Area) किती राहील याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच अशा करारामध्ये इमारत बांधकाम रेखाचित्र (Building Plans & Drawings) यांचा समावेश करणे यंत्रणेवर शासन निर्णयान्वये बंधनकारक व अनिवार्य आहे. प्रशासकीय मान्यतेव्यतिरिक्त बांधकामाध्ये भर घालणे/सुधारणा करणे/बांधकामाचे क्षेत्रामध्ये बदल करणे किंवा जमीन वापराच्या प्रयोजनामध्ये बदल करणे इत्यादी बाबी जिल्हाधिकारी व सक्षम नियोजन प्राधिकरण (म्हणजेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका, इत्यादी) यांच्या पूर्वमान्यतेशिवाय करता येणार नाहीत. 11. सदर कार्यक्रमांतर्गत कामावर होणारा खर्च हा अंदाजपत्रकाप्रमाणे प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या मर्यादेत करावा. अंदाजपत्रकाच्या तसेच कामाच्या तांत्रिक बाबी व गुणवत्तेबाबत कार्यान्वियीन यंत्रणा जबाबदार असेल. 12. अन्य नियमीत योजनेसाठी जे निकष, नियम, मर्यादा, कार्यपध्दती लागू असतील ते सर्व या कार्यक्रमांतर्गत कामांसाठी लागू राहतील. 13. काम पूर्ण झाल्यानंतर त्या कामाचे परिरक्षणासाठी होणारा खर्च या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय नाही. 14. यंत्रणेने सदरील काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे हस्तांतरण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे करावे व काम अर्धवट राहणार नाही याबाबत पूर्ण दक्षता घेण्यात यावी. 15. जिल्हा परिषद मालकीच्या जागेवरील कामे असल्यास यंत्रणेने कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी जिल्हा परिषदेची नाहरकत घेऊन त्यानंतरच कामांना सुरुवात करावी. कामांची अथवा निधीची द्विरुक्ती होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. याबाबत काही वाद उद्भवल्यास त्यासाठी कार्यान्वियीन यंत्रणेला सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल. 16. निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता कामाचे कार्यक्षेत्रात लागू असल्यास, आचारसंहितेच्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील. काम सुरु करण्यापूर्वी याबाबत योग्य दक्षता घ्यावी. 17. या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणारी मालमत्ता ही शासनाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची राहील. सदर मालमत्ता कोणत्याही व्यक्तीच्या / खाजगी संस्थेच्या / विश्वस्तांच्या नावे करणे अनुज्ञेय नाही. 18. स्मशानभूमी/कब्रस्थानची कामे करताना लोकांना बसण्यासाठी व थांबण्यासाठी बाकडी टाकणे / शेडस बांधणे, हातपाय धुण्यासाठी पाणी पुरवठ्याची सोय करणे, आवश्यकतेनूसार दहनासाठी स्टॅन्ड बांधणे, संरक्षणभिंत बांधणे, अंतर्गत पेव्हर ब्लॉक्स बसविणे/फरशी बसविणे/कॉंक्रीटीकरण करणे तसेच घाट बांधणे केवळ एवढीच कामे अनुज्ञेय आहेत. याव्यतिरिक्त कामांचा सदर कार्यक्रमांतर्गत समावेश अनुज्ञेय राहणार नाही. याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. 19. कामे पूर्ण झाल्यावर कामांच्या दर्शनी भागावर शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे फलक लावणे बंधनकारक आहे. 20. लहान रस्ते, पूल व साकव बांधणे ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानूसार हाती घ्यावीत. 21. प्रशासकीय मान्यता ज्या कामासाठी दिली आहे त्याच स्वरुपाचे बांधकाम होणे आवश्यक आहे. कामाच्या प्रकारात बदल केल्यास सदरची बाब आदेशाचे गंभीर उल्लंघन गृहीत धरुन, संबंधीत अभियंता/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली जाईल. 22. वीज देयके अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी



Scanned with CamScanner

संबंधीत अभिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील. याबाबतचे हमीपत्र कार्यान्वयीन यंत्रणेने कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यापूर्वी मुळ प्रतीत प्राप्त करुन घ्यावे.

(श्री. विजय राठोड)
जिल्हाधिकारी
जालना

प्रति -

कार्यान्वयीन यंत्रणा - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना

प्रत- श्री. राजेशभैय्या टोपे ,विधानसभा मतदार संघ, घनसावंगी यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत माहितीसाठी-

जिल्हा कोषागार अधिकारी, जालना.

निधी वितरण / निवड नस्ती



Scanned with CamScanner